सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

संदर्भ:- महाराष्ट्र शासन,मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक नामिका-२०२६/ प्र.क्र. १२६ (ई-१७१५९०७)/भाषा-२, दि.१०/०८/२०२६

विषय:- मराठी मजुकराचा इंग्रजी व इंग्रजी मजुकराचा मराठीत अनुवाद करण्यासाठी खाजगी अनुवादकांची नामिका स्थापन करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक नामिका -२०२६ / प्र.क्र.१२६ (ई-१७१५९०७)/भाषा-२ दि.१०/०८/२०२६,ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०८१०१५२२१६९८३३ असा आहे.

२. तरी, सदर शासन भाषानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 11-08-2026 16:06:23

(चंद्रशेखर शिंदे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), (नियोजन व समन्वय) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

मराठी मजुकराचा इंग्रजी व इंग्रजी मजकुराचा मराठीत अनुवाद करण्यासाठी खाजगी अनुवादकांची नामिका स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांक: नामिका-२०२६/प्र.क्र.१२६(ई-१७१५९०७)/भाषा-२
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २०२६

संदर्भ :-

१. शासन निर्णय, मराठी भाषा विभाग क्र. नामिका-२०१९/प्र.क्र.२९/भाषा-२, दि. २२ मार्च, २०२१
२. भाषा संचालनालयाचे पत्र क्र. इंमना-२०२५/प्र.क्र.१२९/७४४/चौदा, दि. १८.०६.२०२६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या कलम ४ व ५ अन्वये मराठी भाषेमध्ये सादर करणे आवश्यक असलल्या “विधीमंडळ कामकाज, अर्थसंकल्पविषयक प्रकाशने, शासकीय विधेयके, केंद्रीय व राज्य कायदे व अधिसूचना” इ. इंग्रजी दस्तऐवजांचा मराठी भाषेमधील अनुवाद सद्य:स्थितीत भाषा संचालनालयामार्फत करण्यात येतो. यामध्ये गोपनीय स्वरुपाच्या तसेच वैधानिक व विधानमंडळाच्या कामाचा समावेश आहे. भाषा संचालनालयाने सदर कामे करणे अनिवार्य आहे. मात्र, अलिकडे अनेक विभागांकडून, शासकीय व निमशासकीय कार्यालयांकडून, स्वायत्त संस्थांकडून वरील कामांव्यतिरिक्त इंग्रजी कागदपत्रे अनुवादासाठी भाषा संचालनालयाकडे प्राप्त होतात. उदा. विभागाचे धोरण, योजना, तज्ज्ञ समितीचा अहवाल इ. त्यामुळे अनिवार्य अनुवादाच्या कामांव्यतिरिक्त अन्य कामांमध्ये भाषा संचालनालयातील अनुवादकांची मदत घेण्यात येत असल्याने मूळ अनिवार्य कामांवर त्याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे वरील अनिवार्य कामांव्यतिरिक्त प्राप्त होणाऱ्या इंग्रजी व मराठी भाषेतील कागदपत्रांचा अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक २२ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये खाजगी अनुवादकांची नामिका स्थापन करण्यात आली आहे. सदर नामिकेची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधील दि. २२ मार्च, २०२१ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. शासकीय/निमशासकीय कार्यालये, स्वायत्त संस्था इत्यादींकडील कागदपत्रातील इंग्रजी व मराठी भाषेतील मजुकराचा अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यासाठी खालीलप्रमाणे खाजगी अनुवादकांची नामिका स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर नामिकेची मुदत तीन वर्ष किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत राहील.

अ.क्र.	उमेदवाराचे नाव	संपूर्ण पत्ता, ई-मेल व संपर्क क्रमांक
१	२	३
१	श्री. रवींद्र हरि अभ्यंकर	गंगावतरण, २०६५ सदाशिव पेठ, पुणे - ४१००३० भ्रमणध्वनी क्र. ७५८८०९०४३३ ई-मेल :- raviabhyankar१४०@gmail.com
२	श्रीम. माधुरी विनायक पांगे	बी-४०८, निसर्ग सहकारी गृह.संस्था, भोईवाडा, परळ, मुंबई - ४०००१२ भ्रमणध्वनी क्र.९५९४७६९७८६ ई-मेल :- madhurimayekar@yahoo.com
३	श्री. सुनिल विष्णू करमरकर	बी-२०३, लिंक पॅलेस, साईबाबा कॉम्प्लेक्स, मोहन गोखले रस्ता, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३ भ्रमणध्वनी क्र.९५९४६१७०७० ई-मेल :- karmarkar.sunil@gmail.com
४	श्रीम. प्रज्ञा जांभेकर	एच-१६, ६०२, आशियाना प्रेस एनक्लेव्ह, प्रतीक्षा नगर, सायन (पूर्व), मुंबई - ४०००२२ भ्रमणध्वनी क्र.९९६७०६३३३१ ई-मेल :- jambhekar.prajna@gmail.com
५	श्रीम. तेजाली चंद्रकांत शहासने	राहुल कॉम्प्लेक्स, ए १२, कृष्णा हॉस्पिटलच्या बाजूला, पौड रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८ भ्रमणध्वनी क्र. ९८६००८५११० ई-मेल :- tejali.shahasane@gmail.com
६	श्रीम. प्राजक्ता कासले	३०१/सी-४०, प्रेमसागर सोसायटी, सेक्टर-२, शांतीनगर, मीरा रोड, ठाणे - ४०११०७ भ्रमणध्वनी क्र.९८७०५८८१३२ ई-मेल :- prajaktakasale२०१८@gmail.com

७	श्री. शरद दत्तात्रय आफळे	ए-४/४ नीतु अपार्टमेंट, राजपार्क को.ऑ.हौ.सो.१, जुना मुंबई-पुणे रस्ता, कळवा (पश्चिम)-४००६०५. भ्रमणध्वनी क्र. ७७३८५४२३५३ ई-मेल :- aphale१९५३@yahoo.com
८	प्रा. अनिल श्रीपाद गोरे	अ-११२, बाळाजी प्रासाद, दक्षिणमुखी मारुती शेजारी, अप्पा बळवंत चौकाजवळ, थोरले बाजीराव पेशवे पथ, पुणे ४११०३०. भ्रमणध्वनी क्रमांक ९४२२००१६७१, ई-मेल :- marathikaka@gmail.com
९	श्री. यशवंत शंकर थोरावडे	ईस्टर्न विंग्स कॉ. सोसायटी, ए/९०१, बंटा संघासमोर, शेट्टी कॉलेजला लागून, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०० ०७० भ्रमणध्वनी क्रमांक ९९८७०६३४०१, ई-मेल yashwant२५५७@gmail.com
१०	श्रीम. रेश्मा भास्कर घाणेकर	१२०८, अ/२, रत्नाकर आपटे मार्ग, पुणे-४११००४. भ्रमणध्वनी क्रमांक ९८२२२५१७४१, ई-मेल :- rbgonline@gmail.com
११	श्रीम. प्राची वासुदेव कोल्हटकर	२०२, मंजुनाथ टॉवर, व्ही.पी. रोड, पेंडसे नगर, डोंबिवली - ४२१२०१. भ्रमणध्वनी क्रमांक ९८२०४३८१३७, ई-मेल :- prachi.vkolhatkar@gmail.com
१२	श्री. राजेश सिद्राम दासा	५०१, पॅरामाऊंट गार्डन, कात्रज कोंढवा रोड, गोकुळनगर, कात्रज, पुणे-४११०४६. भ्रमणध्वनी क्रमांक ९८५०८१४६५२, ८२०८१९८४४९ ई-मेल:-rajesh.dasao@gmail.com adv.rajeshdasa@gmail.com
१३	श्री. सुनील साईनाथ भागवत	१००/४, महेश सोसायटी, बिबवेवाडी, पुणे-४११०३७ ०२० - २४४१२४६८, भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३५८४६०१ ई-मेल :- sunil१४११६५@gmail.com
१४	श्री. श्रीपाद रामचंद्र पुराणिक	२४, रामविजय सोसायटी, तीन देवळांच्या मागे, गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व), जिल्हा-ठाणे भ्रमणध्वनी क्रमांक ९८६९२६१८४६ ई-मेल :- vallabh२३५६१@gmail.com
१५	श्री. निलेश कृष्णराव बंडाळे	फ्लॅट क्र. ६, पहिला मजला, स्वप्नील अपार्टमेंट, दशमेश नगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५ भ्रमणध्वनी क्रमांक ९९२३४५२२२३ ई-मेल :- transnilesh@gmail.com

२. **नामिकेची कार्यकक्षा :-** भाषा संचालनालयाच्या अनुवाद शाखेमार्फत अनुवाद करण्यात येणाऱ्या "विधिमंडळ कामकाज, अर्थसंकल्पविषयक प्रकाशने, शासकीय विधेयके, केंद्रीय व राज्य कायदे, अधिसूचना अशा प्रकारचे वैधानिक कामकाज तसेच गोपनीय स्वरूपाचे कामकाज" इ. प्रकारच्या कागदपत्रांच्या अनुवादाचे काम वगळता प्रशासकीय विभागांकडून, शासकीय व निमशासकीय कार्यालयांकडून, स्वायत्त संस्थांकडून अनुवादासाठी प्राप्त होणाऱ्या अन्य इंग्रजी व मराठी कागदपत्रांचा अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषेमध्ये अनुवाद करण्यापुरतीच सदर नामिकेची कार्यकक्षा मर्यादित असेल.

३. **नामिकेतील अनुवादकांना काम देताना संबंधित विभाग/कार्यालये यांनी करावयाची कार्यवाही :-**

(एक) नामिकेतील अनुवादकास काम देण्यासंदर्भात विभागाने/कार्यालयाने संबंधित अनुवादकाला द्यावयाच्या पत्रामध्ये पुढील बाबींचा उल्लेख करणे आवश्यक आहे -

(अ) अनुवादासाठी द्यावयाच्या मजकुराची शब्दसंख्या - साधारणपणे एका ओळीत आठ ते दहा शब्द असतात व एका पृष्ठात २५ ते ३० ओळी असतात. त्याप्रमाणे एका पृष्ठातील ओळी व पृष्ठे मोजून संबंधित विभागाने/कार्यालयाने शब्दसंख्या निश्चित करावी.

(ब) अनुवादकांना अनुवादाचे काम देताना काम किती कालावधीत पूर्ण करून हवे आहे याचा विहित दिनांक विभागाने/कार्यालयाने नमूद करावा.

(दोन) अनुवादासाठी अनुवादकांना अनुवाद व त्याचे टंकलेखन करण्याच्या कामासाठी, पहिल्या ५००० शब्दांसाठी प्रतिशब्द रु.१.५० (अनुवाद व टंकलेखनासह) व ५००० शब्दांच्या पुढे प्रतिशब्द रु.१.४० (अनुवाद व टंकलेखनासह) इतका दर अदा करण्यात येईल.

(तीन) अनुवादाचे काम पूर्ण केल्यानंतर अनुवादकाचे मानधन लवकरात लवकर अदा करण्याची जबाबदारी अनुवादकास काम देणाऱ्या संबंधित विभागाची राहील.

(चार) संबंधित विभाग/कार्यालय यांनी अनुवादकाने करून दिलेल्या अनुवादाबाबतचे अभिप्राय भाषा संचालनालय, मुंबई यांच्याकडे पाठवावेत.

(पाच) अनुवादामध्ये विभागाशी संबंधित एखाद्या बाबीसंबंधी अचूक शब्द वापरणे आवश्यक असल्यास संबंधित विभागाने त्यानुसार अनुवादकांना सूचना द्याव्यात.

४. **नामिकेतील अनुवादकांनी करावयाची कार्यवाही :-**

(अ) अनुवाद करताना भाषा संचालनालयाने विकसित केलेल्या परिभाषा कोशांचा वापर करावा. प्रत्येक विभागात/कार्यालयात कामाच्या स्वरूपाप्रमाणे काही ठराविक संज्ञांचा वापर

करण्यात येतो. अशा संज्ञा समजून घेऊन नामिकेतील अनुवादकांनी अचूक अनुवाद करून देणे आवश्यक राहील.

(ब) अनुवादकांनी त्यांना ठरवून देण्यात आलेल्या कालमर्यादेत अनुवादाचे काम पूर्ण करून त्याची टंकलिखित प्रत संबंधित विभागास/कार्यालयास द्यावी.

(क) प्रत्येक अनुवादकाने त्याने केलेल्या अनुवादाच्या कामाचा त्रैमासिक अहवाल भाषा संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर करावा.

(ड) अनुवादकांनी केलेला अनुवाद स्वतःच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रमाणित करून देणे आवश्यक राहील.

५. नामिकेसंदर्भात भाषा संचालनालयाने करावयाची कार्यवाही :-

(अ) संबंधित विभागांचे/कार्यालयांचे अभिप्राय व अनुवादकांचे अहवाल यानुसार नामिकेतील अनुवादकांच्या कामाचे वेळोवेळी मूल्यमापन करावे.

(ब) नामिकेतील अनुवादक आणि संबंधित कार्यालये यांना अनुवादाच्या कामकाजासंदर्भात लागणारे मार्गदर्शन करावे. तसेच त्यांना या संदर्भात येणाऱ्या अडचणी व तक्रारी इत्यादींचे निवारण करावे.

(क) नामिकेतील अनुवादकांनी केलेल्या कामाचा एकत्रित वार्षिक अहवाल भाषा संचालनालयाने दरवर्षी मे महिन्यात शासनास सादर करावा.

६. एखाद्या अनुवादकाचे काम समाधानकारक नसल्यास त्या अनुवादकांची नामिकेवरील नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१०१५२२१६९८३३ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAISHALI LAHU WAGHMARE

Digitally signed by VAISHALI LAHU WAGHMARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Marathi Language Department,
2.5.4.20=1A04BC63DAD109DBCF1F43D6AD6A6B5F92B8F2C67D44331739500EBA2BDFC622, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F55703449409327 3E810D83B4B4760417E6293A17606F1295B2E68D6F099E122, cn=VAISHALI LAHU WAGHMARE
Date: 2026.08.10 15:23:13 +05'30'

(वैशाली वाघमारे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.सभापती महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभाग) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
९) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
१०) मा. मंत्री, मराठी भाषा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१३) सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१४) जिल्हाधिकारी, सर्व
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
१८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने)
१९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानपरिषद /विधानसभा, विधानभवन, मुंबई.
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
२१) सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२२) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
२३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई,
२६) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२७) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२८) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२९) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णय त्यांनी त्यांच्या विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.
३०) नामिकेतील सर्व संबंधित खाजगी अनुवादक (भाषा संचालनालयामार्फत)
३१) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२) निवडनस्ती (भाषा-२).